महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
Phone: 0253-2539175 / EPABX: 0253-2539100 - 300 / Fax: 0253-2539176
E-mail: pro@muhsnashik.com / Web: www.muhsnashik.com

क्र. मआविवि/पीआर/२३२/२०११ दि. १० मार्च २०११

वृत्त प्रसिध्दीसाठी

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या प्रति कुलगुरुपदाचा कार्यभार डॉ.ए.पी. कुलकर्णी यांनी स्वीकारला.

**नाशिक (दि.१०)** : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या प्रति कुलगुरु पदाचा कार्यभार मा.डॉ.ए.पी. कुलकर्णी यांनी विद्यापीठाच्या नाशिक मुख्यालयात मा. कुलगुरु डॉ.अरुण जामकर यांच्या उपस्थितीत आज दि. १० मार्च २०११ रोजी स्वीकारला.

विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल महामहिम मा.श्री. के. शंकरनारायणन यांनी मा.डॉ.ए.पी. कुलकर्णी यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ भाग १५(१) अन्वये प्रति कुलगुरुपदी नियुक्ती केली आहे. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये तसेच प्रशासकीय कामकाजामध्ये कुलगुरुंच्या सहाय्यतेकरीता प्रति कुलगुरु पद अस्तित्वात असते.

या प्रसंगी विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ. अरुण जामकर, कुलसचिव डॉ.आ.ना.सूर्यकर आयुर्वेद व युनानी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकांत देशमुख, होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.अरुण भस्मे, डॉ. अभय पाटकर, डॉ.रत्नाकर धामणकर यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.अरुण जामकर यांनी सांगितले की, डॉ. अशोक कुलकर्णी यांच्या कारकीर्दीत त्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांचा प्रदिर्घ अनुभवाचा विद्यापीठाच्या कार्यप्रणालीस निश्चितच मोठा लाभ मिळू शकेल अशा अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या. विद्यापीठाची पुणे, मुंबई येथील विभागीय केंद्रे अधिक सक्षम करण्यासाठी डॉ. कुलकर्णी प्रयत्नशिल रहातील असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी नवनियुक्त प्रति कुलगुरु डॉ.ए.पी. कुलकर्णी यांनी सांगितले की, विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधनात्मक विकासात विशेष लक्ष केंद्रीत करणार असून माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पुर्ण करण्याचा प्रयत्न करेन. विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजामध्ये प्रामुख्याने तक्रार निवारण समिती, विविध प्रशासकीय बाबी, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन याबाबत यशस्वीपणे काम करण्याचा प्रयत्न करेन असेही त्यांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, डॉ.ए.पी. कुलकर्णी हे सध्या शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रम, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या स्टेट हेल्थ सिस्टम्स रिसोर्स सेंटर, पुणेच्या वरिष्ठ सल्लागारपदी कार्यरत असून त्यांनी MBBS, DPH, MD, Ph.D आदी पदव्या संपादन केल्या आहे. त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, आरोग्य विभाग, पैठण, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड आदी ठिकाणी व्याख्याता, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक आदी पदांवर यशस्वीपणे कार्य केले असून त्यांचा ३४ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ.ए.पी कुलकर्णी यांचे विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित झाले आहे. त्यात Text Book of Community Medicine, Manual of Biostatistics, Samudayik Arogya Ani Paricharika Seva, Maternal & Child Health आदी पुस्तके आणि २० हून अधिक प्रादेशिक आणि राष्ट्रीय जर्नल प्रसिध्द झाले आहे. त्यांनी आतापर्यंत विविध पदावंर काम केले असून विविध पुरस्कारांनी त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. त्यांनी इंडियन असोसिएशन ऑफ प्रिव्हेंटिव्ह ॲण्ड सोशल मेडिसिनचे उपाध्यक्षपद, औरंगाबाद येथे आयोजित ३६ व्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ इंडियन असोसिएशन ऑफ प्रिव्हेंन्टिव्ह ॲण्ड सोशल मेडिसिनचे आयोजक सचिव म्हणून पद भूषविले आहे. तसेच त्यांनी आगा खान फाऊंडेशनच्या आरोग्य व्यवस्थापन विकासाच्या विशेष कार्यक्रमांचे सल्लागार म्हणूनही काम पाहिले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी श्री. स्वप्नील तोरणे यांनी केले. याप्रसंगी विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

कुलसचिव

